भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वाहन चालक या पदाचे सुधारित ग्रेड पे तसेच एकाकी पद मंजुरीबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः आपना २०१५/प्र.क्र.२५५/पापु-१५

७ वा मजला, गो.ते. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: १ जानेवारी, २०१६

वाचा :-

१) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रा.पा.पु. १०००/प्र.क्र.१०७(५)/ पापु-०७, दिनांक १४ नोव्हेंबर, २०००

२) शासन निर्णय,ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. एपिटी-२०११/प्र.क्र.४२८/आस्थापना-८, दिनांक १७ सप्टेंबर, २०१२

३) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. आपना २०१२/प्र.क्र.३७८/ पापु-१५, दिनांक १७ एप्रिल, २०१३

४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा ३, दिनांक १७/५/२००३

५) शासन निर्णय , वित्त विभाग क्र. वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा ३, दिनांक १ जुलै, २०११

६) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४

७) शासन पुरकपत्र, वित्त विभाग,क्र. आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३,दिनांक १० फेब्रुवारी, २०१५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १७० अन्वये राज्य शासनाकडील विंधन विहीर कार्यक्रम व वायुसंपीडक सुरूंग योजना हा विषय संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये राज्य शासनाकडील हा कार्यक्रम राबविण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या आस्थापनेवर निर्माण केलेली गट-ब, क व ड संवर्गातील पदे रद्द करून तेवढी पदे जिल्हा परिषद आस्थापनेवर निर्माण केली आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २४३ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाच्या गट “क” व “ड”मधील कर्मचाऱ्यांचे कायमस्वरूपी समावेशन जिल्हा परिषदेमध्ये संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले आहे. त्यात वायुसंपीडक चालक या संवर्गातील कर्मचाऱ्यांचा समावेश होता. त्यामुळे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे सद्या वायुयंपीडक चालकाची पदे अस्तित्वात नाहीत.

तसेच जिल्हा परिषदेकडे वायुसंपीडक चालकांची पदे अस्तित्वात नाहीत. रिक्त पदे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे तर्फे भरावयाची नसल्याने वाहन चालक यांना वायुसंपीडक चालक या पदांकरिता

असलेली पदोन्नतीची तरतूद रद्द करण्याचा तसेच वाहन चालक या एकाकी पदाला आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वायु संपीडक चालक या पदाचे जिल्हा परिषदेकडे कायमस्वरूपी संदर्भीय क्र. २ व ३ च्या शासन निर्णयान्वये समावेशन करण्यात आले आहे त्यामुळे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये वायु संपीडक चालकांची पदे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वाहन चालकांना वायुसंपीडक चालक या पदाकरिता असलेली पदोन्नतीची तरतूद याद्वारे रद्द करण्यात येत असून सदर पद एकाकी पद म्हणून याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

२ या परिस्थितीत वाहन चालक या एकाकी पदास पदोन्नतीची संधी नसल्याने वित्त विभागाच्या दिनांक १७/०५/२००३, दि. ०१/०७/२०११, दि. ०६/०९/२०१४ व दि. १०/०२/२०१५ च्या शासन निर्णयांतील तरतुदी विचारात घेऊन वाहन चालकांना अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ मंजूर करण्यात यावा.

३ हे आदेश केवळ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वाहन चालक पदांना लागू राहतील. मात्र कंत्राटी तत्वावरील व तदर्थ नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

४ हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५०६/१५/सेवा-३, दिनांक २७/१०/२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११०५०१४३८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sawant Mahesh B

Digitally signed by Sawant Mahesh B
DN: CN = Sawant Mahesh B, C = IN, S = Maharashtra, O = Govt of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2016.01.01 16:22:45 +05'30'

(म. भ. सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे

२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
७. निवड नस्ती, पापु-१५